# एच ॲण्ड आर जॉन्सनतर्फे महाराष्ट्र व गोव्यामध्ये मोठ्या आकाराचे जॉन्सन पोर्सिलॅनो रॉयल केअर टाइल स्लॅब्स सादर

**पुणे, ९ एप्रिल २०१८ :** भारतीय टाइल क्षेत्रामध्ये अनेक नाविन्यपूर्ण उत्पादने दाखल करण्याचा आपला वारसा कायम राखत एच ॲण्ड आर जॉन्सन (इंडिया) या भारताच्या इंटीग्रेटेड लाइफस्टाइल सोल्यूशन देणारी टाइल्स, बाथरूम उत्पादने आणि उत्कृष्ट दर्जाचे मार्बल व क्वॉर्ट्झ उत्पादने देणाऱ्या आघाडीच्या कंपनीने टाइल्समधील उत्पादनांची नवीन रेंज सादर केला आहे. यामध्ये नवीन **जॉन्सन पार्सेलेनो रॉयल केअर स्लॅब्स** या मोठ्या आकाराच्या टाइल सीरीजचा समावेश आहे.

पुण्यामधील हॉटेल जे डब्ल्यू मेरिएट येथे ९ एप्रिल २०१८ रोजी महाराष्ट्र व गोवा या राज्यांमधील त्यांच्या प्रमुख डीलर्ससाठी आयोजित करण्यात आलेल्या डीलर बैठकी दरम्यान ही नवीन उत्पादने सादर करण्यात आली. डीलर बैठकीला कंपनीचे वरिष्ठ व्यवस्थापकीय मंडळ उपस्थित होते. यामध्ये प्रिझम सिमेंट लि.चे व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय अग्रवाल तसेच एच ॲण्ड आर जॉन्सन (इंडिया) मधील विक्री व विपणन विभागाचे वरिष्ठ उपाध्यक्ष श्री. अनूप श्रीकुमार आणि उत्पादन विकास व विपणन विभागाचे वरिष्ठ उपाध्यक्ष श्री. दिनेश व्यास यांचा समावेश होता.

याप्रसंगी बोलताना श्री. विजय अग्रवाल म्हणाले, ‘‘एच ॲण्ड आर जॉन्सन (इंडिया)ने नुकतीच भारतातील उपस्थितीची ६० वर्षे पूर्ण केली, ज्यामुळे आम्ही भारतातील सर्वात जुना व अनुभवी ब्रॅण्ड बनलो आहोत. आमच्या कंपनीच्या कार्यसंचालनाच्या या ६०व्या वर्षामध्ये आज आम्हाला या राज्यांमधील आमच्या ग्राहकांसाठी वॉल व फ्लोअर टाइल उत्पादनांची नवीन रेंज सादर करताना खूप आनंद होत आहे. जॉन्सन कंपनी दर्जा, टिकाऊपणा, वैशिष्ट्ये किंवा समकालीन डिझाइन्सच्या संदर्भात सर्वोत्तम उत्पादने सादर करण्यामध्ये अग्रस्थानी राहिली आहे. आज पुणे येथे सादर करण्यात आलेल्या नवीन उत्पादनांच्या रेंजमधून आमच्या ग्राहकांना सर्वोत्तम लाइफस्टाइल सोल्यूशन्स देण्यासाठी असलेली आमची कटिबद्धता दिसून येते.’’

**सादर करण्यात आलेली नवीन उत्पादने**

सादरीकरण कार्यक्रमादरम्यान एचॲण्डआर जॉन्सनने जॉन्सन टाइल्स, जॉन्सन मार्बोनाइट, जॉन्सन पोर्सिलॅनो व जॉन्सन एण्डुरा या आपल्या ४ टाइल ब्रॅण्ड शाखांमध्ये विविध आकारांमधील व विविध नवीन वैशिष्ट्ये असलेल्या२०० हून अधिक नवीन टाइल संकल्पना सादर केल्या.

सादरीकरणाचे खास आकर्षण ठरले ते जॉन्सन पोर्सिलॅनोचे युनिक केअर® अडवान्टेजसह मोठ्या आकारातील पोर्सिलेन स्लॅब्स. या युनिक केअर अडवान्टेजमध्ये ॲन्टी-मायक्रोबिअल वैशिष्ट्य आहे, जे टाइलचा पृष्ठभाग स्वच्छ व आरोग्यदायी ठेवते. १२०×१२० सेमी, १२०×१८० सेमी आणि १२०×२४० सेमी अशा मोठ्या

आकारांमध्ये उपलब्ध असलेले हे स्लॅब्स स्पष्ट दिसणाऱ्या टाइल जॉईंट लाईन्स कमी कमी करतात आणि जागेला अधिक मोठे व आकर्षक रूप देतात. श्री. दिनेश व्यास म्हणाले, ''फक्त एवढेच नाही पोर्सिलॅनो स्लॅब्समध्ये आरोग्यदायी व स्वच्छतेविषयक वैशिष्ट्ये आहेत, आम्ही टाइलच्या क्षमतेच्या संदर्भात कोणतीच तडजोड न करता पारंपारिक टाइलपेक्षा या टाइल्स काहीशा पातळ केल्या आहेत. यामुळे इमारतीवरील वजनाचा भार कमी होईल आणि प्रतिचौरस फूट कमी वजनामुळे टाइल्सच्या वाहतूकीदरम्यान गाडीमधून बाहेर पडणारा धूर कमी होण्यासोबचत पर्यावरणाचे रक्षण होण्यास मदत होईल.''

याव्यतिरिक्त जॉन्सन पार्सिलॅनो ब्रॅण्ड अंतर्गत भिंती व जमिनीवरील उपयोगासाठी ३२ नवीन टाइलिंग थीम्स सुद्धा सादर करण्यात आल्या. या थीम्समध्ये युनिक जर्म-फ्री वैशिष्ट्य आहे आणि १२०×६० सेमी आकाराच्या अधिक पातळ स्लॅब्समध्ये अनेक लाभ समाविष्ट आहेत.

आणखी एक प्रमुख ब्रॅण्ड 'जॉन्सन मार्बोनाइट'च्या संदर्भात कंपनीने या क्षेत्रातील सर्वाधिक शुभ्र अशी टाइल 'हिमालयन व्हाइट'सोबतच विट्रिफाईड पॉलिश व मॅट फिनिशेसमधील ८० सेमी ×८० सेमी, ६० सेमी ×१२० सेमी व ८० सेमी × १६० सेमी आकारांमधील ६० हून अधिक नवीन संकल्पना सादर केल्या.

कंपनीने ३०×६० सेमी आकारामधील टाइल्सची जॉन्सन पार्सिलॅनो स्मार्ट सीरीजमधील संकल्पना देखील सादर केली. या अत्यंत पातळ टाइल्स असून त्यांची जाडी फक्त ५ मिमी आहे आणि त्यांच्यामध्ये जर्म-फ्री वैशिष्ट्य आहे. या वॉल टाइल विभागातील अशा प्रकारची मोठ्या आकारातील उत्पादने सादर करणारी ही जगातील एकमेव कंपनी आहे.

जॉन्सन टाइल्स ब्रॅण्ड अंतर्गत ८० सेमी × ४० सेमी आकारातील 'क्राफ्ट' (KR@FT) सीरीज हे नवीन सादरीकरण आहे. तसेच ट्रेण्डी मॅट फिनिशमधील आकर्षकतेसह ६० सेमी × ३० सेमी आकारातील वॉल टाइल्सची नवीन रेंज देखील सादर करण्यात आली. या नवीन सीरीजची खासियत म्हणजे मॅट पृष्ठभाग असूनही या पृष्ठभागाची सहजपणे काळजी घेता येते आणि पृष्ठभागावर स्क्रॅचेस् देखील पडत नाहीत. या वॉल टाइल संकल्पनेसोबतच ६० सेमी × ६० सेमी आकारामधील फ्लोअर टाइल्सची नवीन रेंज देखील सादर करण्यात आली. या फ्लोअर टाइल्सवर डाग पडत नाही आणि त्यावरून पाय देखील घसरत नाही.

''जॉन्सन एण्डुरा ही औद्योगिक व विशेषीकृत टाइलिंग विभागामधील पहिली व सर्वात प्रबळ रेंज आहे. निवडक शहरांमध्ये नुकत्याच सादर करण्यात आलेल्या आमच्या **रेडी टू यूज जॉन्सन एण्डुरा स्टेपिंग स्टोन या जिन्यासाठी खास बनवलेल्या** टाइलिंग सोल्यूशन्ससाठी मिळालेला प्रतिसाद पाहून आम्हाला खूप आनंद होत आहे. आम्ही आता ही विशेष उत्पादन रेंज अधिकाधिक शहरांमध्ये सादर करत आहोत आणि देशभरातील कोणत्याही मागणीची पूर्तता करण्यासाठी आम्ही सक्षम आहोत. तसेच आम्हाला सांगताना खूप आनंद होत आहे की आमच्या जॉन्सन एण्डुराला नुकतेच **'कन्झ्युमर सुपरब्रॅण्ड्स'** दर्जासह गौरविण्यात आले आहे. यामधून कंपनी कार्यरत असलेल्या विभागामधील तिचे अग्रस्थान व लोकप्रियता दिसून येते,'' असे कार्यक्रमाप्रसंगी श्री. अनुप श्रीकुमार म्हणाले. एण्डुरा ब्रॅण्ड अंतर्गत नवीन रेंज ४० सेमी × ४० सेमी आकाराचे एण्डुरा डिझाइनर कलेक्शन

आहे. हे कलेक्शन आकर्षक असण्यासोबतच पॅसेजेस्, पॅटिओ व कॉरिडॉर्स सरख्या व्यापक जागांसाठी अत्यंत उपयोगी आहे.

**एच ॲण्ड आर जॉन्सन (इंडिया) बाबत :**

१९५८ साली स्थापन झालेली एच ॲण्ड आर जॉन्सन (इंडिया) प्रिझम सिमेंट लिमिटेडचा भाग आहे. भारतात सिरॅमिक टाइल्स प्रथम याच कंपनीने आणल्या. गेल्या सहा दशकांत एच ॲण्ड आर जॉन्सनने ग्राहकांना संपूर्ण सेवा देण्यासाठी उत्पादन श्रेणीचा विस्तार केला. आज एच ॲण्ड आर जॉन्सन अथपासून इतिपर्यंत सर्व जीवनशैली उत्पादने पुरवणारी देशातील एकमेव कंपनी आहे. कंपनी टाइल्स, सॅनिटरी वेअर, बाथ फिटिंग्ज, इंजीनिअर्ड मार्बल व क्वार्ट्झ ही सर्व उत्पादने पुरवते. टाइल्समध्ये जॉन्सनचे चार उपब्रॅण्ड आहेत – जॉन्सन टाइल्स, जॉन्सन पोर्सिलॅनो, जॉन्सन मार्बोनाइट व जॉन्सन एण्डुरा. यांच्या माध्यमातून कंपनी प्रत्येक जागेसाठी व प्रत्येक उपयोगासाठी लागणाऱ्या टाइल्स पुरवते. जॉन्सन बाथरुम्स, बाथरुमशी संबंधित सर्व उत्पादने – सॅनिटरी वेअर, फॉसेट्स, ॲक्सेसरीज व वेलनेस उत्पादने देते. सिरॅमिक / विट्रिफाइड टाइल्समध्ये एच ॲण्ड आर जॉन्सनचे सर्वोत्तम दर्जाचे टाइल उत्पादने तयार करणारे १३ टाइल कारखाने आहेत. या कारखान्यांमध्ये प्रतिवर्ष ६८ दशलक्ष चौ. मीटर उत्पादने निर्माण करण्याची क्षमता आहे. तसेच बाथरूम फिटिंग उत्पादनांसाठी २ कारखाने आहेत. याशिवाय एचॲण्डआर जॉन्सनची ‘हाऊस ऑफ जॉन्सन’ शोरुम्सची साखळी देखील आहे.

अधिक माहितीसाठी कृपया **www.hrjohnsonindia.com** इथे भेट द्या.

**मीडिया संपर्क :**

योहाना इराणी | +91 9920499231| yohanna.irani@madisonpr.in

केतन त्रिवेदी |+91 86920 07772 | trivedi.ketan@hrjohnsonindia.com